ePaper
॥ वर्ष - 8 । अंक - 348 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥
महाईन्यूज (TM)
www.mahaenews.com । रविवार, दि. 27 जुलै 2025 ॥ पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती ॥ mahaenews.com ॥ लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## दारू घोटाळ्यात एकनाथ शिंदेंच्या निकटवर्तीयाला अटक



### आतील पानांत

- कर्णधार गिल इंग्लंडमध्ये चमकला!
- न्यूझीलंडचा आफ्रिकेवर दमदार विजय
- राहुलच्या नशिबात माफी मागणं
- ब्रिटनबरोबर कराराचं कौतुक


## पुरस्कारात महाराष्ट्रातील ‘7’ खासदारांची बाजी

# महाराष्ट्राच्या खासदारांचा डंका!

## सुप्रिया सुळे, श्रीरंग बारणे, वर्षा गायकवाडसह 7 खासदारांना संसदरत्न पुरस्कार

। मुंबई / पुणे / बीड । प्रतिनिधी । महाईन्यूज

**देशातील 17 खासदारांना यंदाचा ‘संसदरत्न पुरस्कार 2025’ जाहीर करण्यात आला आहे. यंदा ‘संसदरत्न’ पुरस्कारांसाठी महाराष्ट्राने बाजी मारली असून महाराष्ट्रातील 7 खासदारांनी या यादीत स्थान पटकावले आहे. संसदेमध्ये उल्लेखनीय, सातत्यपूर्ण आणि उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खासदारांना दरवर्षी ‘प्राईम पॉईंट फाऊंडेशन’ या संस्थेमार्फत हा पुरस्कार दिला जातो. या संसदरत्न पुरस्कारात महाराष्ट्राने यंदाहि बाजी मारली आहे.**



यात सुप्रिया सुळे, श्रीरंग बारणे यांच्यासह भर्तृहरी महताब आणि एन के प्रेमचंद्रन यांना पुरस्कार जाहीर करण्यात आले आहे. यासह अरविंद सावंत, नरेश म्हस्के, स्मिता वाघ, मेधा कुलकर्णी, वर्षा गायकवाड यांनाहि संसदरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.शालेय शिक्षण विभागातील अनावश्यक निर्णयांमुळे आणि त्यामधून निर्माण झालेल्या वादांमुळे दादा भूसे यांना फारशी समाधानकारक कामगिरी करता आलेली नाही. महाराष्ट्रातील खा. स्मिता वाघ (भाजप), मेधा कुलकर्णी (भाजप), सुप्रिया सुळे (राष्ट्रवादी काँग्रेस - शरद पवार गट), श्रीरंग बारणे (शिवसेना), नरेश म्हस्के (शिवसेना), अरविंद सावंत (शिवसेना- उबाठा) आणि वर्षा गायकवाड (काँग्रेस) या सात खासदारांचा संसदेत उत्कृष्ट कामगिरीसाठी ‘संसदरत्न’ पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे.लोकसभा आणि राज्यसभा सचिवालयाच्या आकडेवारीवरून प्राइम पॉइंट फाउंडेशन या संस्थेकडून हे पुरस्कार दरवर्षी प्रदान केले जातात. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या सूचनेनुसार, 2010 मध्ये प्राइम पॉइंट फाउंडेशन आणि ई-मॅगझिन प्रेसेन्स यांनी संसद रत्न पुरस्कारांची स्थापना केली. मे 2010 मध्ये चेन्नई येथे झालेल्या पहिल्या पुरस्कार सोहळ्याचे उद्घाटनही डॉ. कलाम यांनी केले होते. उल्लेखनीय म्हणजे, श्री हंसराज गंगाराम अहिर हे या पुरस्काराचे पहिले प्राप्तकर्ता होते. नागरी समाजाच्या वतीने हे पुरस्कार प्रदान केले जातात. 2024 पर्यंत, 14 पुरस्कार समारंभांमध्ये 125 पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत, ज्यामध्ये वैयक्तिक संसद सदस्य आणि संसदीय स्थायी समित्यांचा समावेश आहे. प्रतिष्ठित पुरस्कार विजेते संसद सदस्य आणि नागरी समाजाचे प्रतिनिधी यांचा समावेश असलेली ज्युरी समिती कामगिरीच्या डेटाच्या आधारे पुरस्कार विजेत्यांची नामांकने करते. हा डेटा लोकसभा आणि राज्यसभा सचिवालयांच्या अधिकृत नोंदी तसेच पीआरएस कायदेविषयक संशोधनातून मिळवला जातो. कामगिरी निर्देशकांमध्ये सुरू झालेल्या वादविवादांची संख्या, खाजगी सदस्यांची विधेयके सादर करण्यात आली आणि उपस्थित केलेले प्रश्न यांचा समावेश आहे. देशातील 17 खासदारांना यंदाचा ‘संसदरत्न पुरस्कार 2025’ जाहीर करण्यात आला आहे. यंदा ‘संसदरत्न’ पुरस्कारांसाठी महाराष्ट्राने बाजी मारली असून महाराष्ट्रातील 7 खासदारांनी या यादीत स्थान पटकावले आहे. संसदेमध्ये उल्लेखनीय, सातत्यपूर्ण आणि उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खासदारांना दरवर्षी ‘प्राईम पॉईंट फाऊंडेशन’ या संस्थेमार्फत हा पुरस्कार दिला जातो. या संसदरत्न पुरस्कारात महाराष्ट्राने यंदाहि बाजी मारली आहे. लोकसभा आणि राज्यसभा सचिवालयाच्या आकडेवारीवरून प्राइम पॉइंट फाउंडेशन या संस्थेकडून हे पुरस्कार दरवर्षी प्रदान केले जातात. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या सूचनेनुसार, 2010 मध्ये प्राइम पॉइंट फाउंडेशन आणि ई-मॅगझिन प्रेसेन्स यांनी संसद रत्न पुरस्कारांची स्थापना केली. मे 2010 मध्ये चेन्नई येथे झालेल्या पहिल्या पुरस्कार सोहळ्याचे उद्घाटनही डॉ. कलाम यांनी केले होते. उल्लेखनीय म्हणजे, श्री हंसराज गंगाराम अहिर हे या पुरस्काराचे पहिले प्राप्तकर्ता होते. नागरी समाजाच्या वतीने हे पुरस्कार प्रदान केले जातात. 2024 पर्यंत, 14 पुरस्कार समारंभांमध्ये 125 पुरस्कार प्रदान करण्यात आले .आहेत, ज्यामध्ये वैयक्तिक संसद सदस्य आणि संसदीय स्थायी समित्यांचा समावेश आहे. प्रतिष्ठित पुरस्कार विजेते संसद सदस्य आणि नागरी समाजाचे प्रतिनिधी यांचा समावेश असलेली ज्युरी समिती कामगिरीच्या डेटाच्या आधारे पुरस्कार विजेत्यांची नामांकने करते. हा डेटा लोकसभा आणि राज्यसभा सचिवालयांच्या अधिकृत नोंदी तसेच पीआरएस कायदेविषयक संशोधनातून मिळवला जातो. कामगिरी निर्देशकांमध्ये सुरू झालेल्या वादविवादांची संख्या, खाजगी सदस्यांची विधेयके सादर करण्यात आली.

### खाजगी सदस्यांची विधेयके सादर

लोकसभा आणि राज्यसभा सचिवालयाच्या आकडेवारीवरून प्राइम पॉइंट फाउंडेशन या संस्थेकडून हे पुरस्कार दरवर्षी प्रदान केले जातात. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या सूचनेनुसार, 2010 मध्ये प्राइम पॉइंट फाउंडेशन आणि ई-मॅगझिन प्रेसेन्स यांनी संसद रत्न पुरस्कारांची स्थापना केली. मे 2010 मध्ये चेन्नई येथे झालेल्या पहिल्या पुरस्कार सोहळ्याचे उद्घाटनही डॉ. कलाम यांनी केले होते. उल्लेखनीय म्हणजे, श्री हंसराज गंगाराम अहिर हे या पुरस्काराचे पहिले प्राप्तकर्ता होते. नागरी समाजाच्या वतीने हे पुरस्कार प्रदान केले जातात. 2024 पर्यंत, 14 पुरस्कार समारंभांमध्ये 125 पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत, ज्यामध्ये वैयक्तिक संसद सदस्य आणि संसदीय स्थायी समित्यांचा समावेश आहे. प्रतिष्ठित पुरस्कार विजेते संसद सदस्य आणि नागरी समाजाचे प्रतिनिधी यांचा समावेश असलेली ज्युरी समिती कामगिरीच्या डेटाच्या आधारे पुरस्कार विजेत्यांची नामांकने करते. हा डेटा लोकसभा आणि राज्यसभा सचिवालयांच्या अधिकृत नोंदी तसेच पीआरएस कायदेविषयक संशोधनातून मिळवला जातो. कामगिरी निर्देशकांमध्ये सुरू झालेल्या वादविवादांची संख्या, खाजगी सदस्यांची विधेयके सादर करण्यात आली आणि उपस्थित केलेले प्रश्न यांचा समावेश आहे.

# पुण्यातील आयटी कंपन्यांसाठी ‘वर्क फ्रॉम होम’

## खा. सुळे यांनी उपमुख्यमंत्री पवार यांना टोला लगावला

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हिंजवडी परिसरातील पायाभूत सुविधा कोलमडून पडल्या असून याचा फटका माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील (आयटी पार्क) कंपन्यांना आणि कर्मचाऱ्यांना बसत आहे. हिंजवडी आयटी कर्मचाऱ्यांना ‘वर्क फ्रॉम होम’ ही सुविधा सुरू करावी आणि येथील शाळांच्या वेळेत बदल करावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली.**



जोपर्यंत पायाभूत सुविधांची सखोल अंमलबजावणी होत नाही, तोपर्यंत बंगळुरू आयटी पार्कच्या धर्तीवर आठवड्यातील केवळ दोन दिवस कर्मचाऱ्यांना बोलवावे, असे पत्र राज्य सरकार आणि ‘हिंजवडी आयटी असोसिएशन’ला पाठविले असल्याचेही सुळे यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री अजित पवार हे देखील शनिवारी पुणे दौऱ्यावर असून त्यांनी हिंजवडी येथील पायाभूत सुविधांची पाहणी करून बैठकांद्वारे संबंधित अधिकाऱ्यांना आदेश दिले आहेत. याबाबत ‘सरकारला उशिरा आलेले शहाणपण आहे’ अशा शब्दात खासदार सुळे यांनी उपमुख्यमंत्री पवार यांना टोला लगावला.पवार म्हणाल्या, ‘गेल्या अनेक महिन्यांपासून हिंजवडी परिसरातील अडचणींबाबत राज्य सरकार, स्थानिक प्रशासन आणि जिल्हाधिकारी यांच्याकडे बैठकीची मागणी करत आहे. मात्र, सरकारचा एकतर्फी कारभार सुरू आहे. आम्हाला कोणत्याच बैठकीला बोलावले जात नाही. तेथील पायाभूत सुविधा कोलमडून पडल्या असून याचा मोठा फटका आयटी कंपन्यांना बसत आहे.’आता सरकारमधील मंत्री, पालकमंत्री हिंजवडी परिसरात सातत्याने दौरे, बैठकांवर बैठका घेत असून, अधिकाऱ्यांना सूचना केल्या जात आहेत. सरकारला हे उशिरा आलेले शहाणपण आहे. यामध्ये राजकारण करायचे नाही. या भागात पायाभूत सुविधा मिळेपर्यंत आयटी कर्मचाऱ्याना ‘वर्क फ्रॉम होम’ ही सुविधा सुरू करावी. बंगळूरूमधील आयटी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना ‘वर्क फ्रॉम होम’ असून आठवड्यातून केवळ दोन दिवस कंपनीत बोलावले जाते. याच धर्तीवर हिंजवडीतील कर्मचाऱ्यांना ‘वर्क फ्रॉम होम’ सुविधा सुरू करावी. याबाबत राज्य सरकार आणि हिंजवडी असोसिएशनला पत्र पाठवले आहे,’ असे सुळे यांनी सांगितले. केंद्र आणि राज्य सरकारच्या निर्देशानुसार शैक्षणिक संस्थांच्या ५०० मीटर परिघात मद्य विक्री किंवा तंबाखुजन्य पदार्थ विक्री करण्यास मनाई आहे. मात्र हिंजवडी परिसरातील शाळांच्या परिसरात अवैध गोष्टी सुरू आहेत. परिसरातील एका शाळेसमोरच एक मोठा ‘बार’ सुरू आहे. याबाबत जिल्हाधिकारी आणि उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना वारंवार पत्रव्यवहार करूनही कार्यवाही होत नाही. पालकमंत्र्यांनी यातून मार्ग काढावा. संसदेचे अधिवेशन संपेपर्यंत हा बार बंद झाला

### पायाभूत सुविधांची पाहणी

जोपर्यंत पायाभूत सुविधांची सखोल अंमलबजावणी होत नाही, तोपर्यंत बंगळुरू आयटी पार्कच्या धर्तीवर आठवड्यातील केवळ दोन दिवस कर्मचाऱ्यांना बोलवावे, असे पत्र राज्य सरकार आणि ‘हिंजवडी आयटी असोसिएशन’ला पाठविले असल्याचेही सुळे यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री अजित पवार हे देखील शनिवारी पुणे दौऱ्यावर असून त्यांनी हिंजवडी येथील पायाभूत सुविधांची पाहणी करून बैठकांद्वारे संबंधित अधिकाऱ्यांना आदेश दिले आहेत. याबाबत ‘सरकारला उशिरा आलेले शहाणपण आहे’ अशा शब्दात खासदार सुळे यांनी उपमुख्यमंत्री पवार यांना टोला लगावला. राज्य सरकार, स्थानिक प्रशासन आणि जिल्हाधिकारी यांच्याकडे बैठकीची मागणी करत आहे.

# अजितदादा सहा वाजताच आयटीपार्क हिंजवडीत

## कामाच्या आड आल्यास 353 नुसार गुन्हा दाखल करण्याचे निर्देश

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राजीव गांधी आयटी पार्क हिंजवडी मधील वाढती वाहतूक कोंडी, नागरी समस्यांची पाहणी उपमुख्यमंत्री, पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी पुन्हा आज (शनिवारी) सकाळी सहा वाजताच केली. विकास कामाच्या आड कोणी आले, तो कोणीही असो, अजित पवार असले तरी ३५३ नुसार सरकारी कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल करण्याचे निर्देश त्यांनी पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांना दिले.**



मे महिन्यात झालेल्या पावसाळ्यात आयटी पार्क वॉटर पार्क झाले होते. त्यामुळे आयटीनगरी हिंजवडीतील समस्या ऐरणीवर आल्या आहेत. वाहतूक कोंडी, नागरी समस्या सोडवण्यासाठी अभियंत्यांनी आंदोलने केली.

या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दोन आठवड्यापूर्वी हिंजवडीतील समस्यांची पाहणी केली होती. दोन आठवड्यापूर्वी अधिकाऱ्यांना दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी सुरू झाली आहेत का, त्यानुसार विकास कामांना सुरुवात केली आहे का, याची शनिवारी अजित पवार यांनी पाहणी केली. वाहतूक कोंडी, रस्ते या नागरी समस्या सोडविण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या. आमदार शंकर मांडेकर, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त योगेश म्हसे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यावेळी उपस्थित होते.द्या. त्यावर तातडीने निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी सांगितले.अजित पवार म्हणाले, विकास कामाच्या आड कोणी आले, तो कोणीही असो, अजित पवार असले तरी ३५३ नुसार सरकारी कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल करण्याचे निर्देश त्यांनी दिले. कोणी आडवा आला तर एखादा समजून सांगावे. प्रत्येकजण काही तरी बोलेल, माझे हे करा, ते करा असे सुरू होईल. ते होऊ द्यायचे नाही. एखादाच संपूर्ण कामच करून टाकायचे, आपले असे ठरले आहे की कोणी मध्ये आले की ३५३ दाखल करायचे, कोणीही असले, तरी ३५३ दाखल करायचे, त्याशिवाय हे काम होणार नाही.हिंजवडीतील समस्यांची पाहणी करून जाताना अजित पवार मोटारीत बसत होते. त्याचवेळी हिंजवडीचे सरपंच तिथे आले. काहीतरी अजित पवार यांना सांगत होते. त्यावर तुम्हाला काय सांगायचे ते सांगा, मी ऐकून घेतो. मला काय करायचे ते मी करतो. आपले वाटोळे झाले. हिंजवडीचे आयटी पार्क पुणे, महाराष्ट्रातून हैदराबाद, बंगळुरूला चालले आहे.

### सरपंचांनाही सुनावले खडेबोल

मी कशाला सकाळी सहा वाजता येऊन पाहणी करीत आहे. मला कळत नाही का, माझीही लोक आहेत. परंतु, ते केल्याशिवाय गत्यंतर नाही, असे अजित पवार म्हणाले.राजीव गांधी आयटी पार्क हिंजवडी मधील वाढती वाहतूक कोंडी, नागरी समस्यांची पाहणी उपमुख्यमंत्री, पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी पुन्हा आज (शनिवारी) सकाळी सहा वाजताच केली.

## हिंजवडीप्रमाणे चाकण औद्योगिकपट्टा समस्यामुक्तीचा संकल्प

# “UNCLOG CHAKAN MIDC” साठी आमदार महेश लांडगे ‘ऑन फिल्ड’

## औद्योगिक कंपन्या, संघटनांच्या प्रतिनिधींची महत्त्वपूर्ण बैठक

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चाकण औद्योगिक पट्टयातील वाहतूक कोंडी आणि पायाभूत सोयी-सुविधांच्या समस्यांमुळे औद्योगिक क्षेत्रातील कंपन्या आणि कर्मचारी यांसह वाहनचालक अक्षरश: हैराण झाले आहेत. औद्योगिक क्षेत्रातील समस्या सोडवण्यासाठी राज्य सरकार आणि स्थानिक शासकीय अस्थापनांमध्ये सक्षम समन्वयाची आवश्यकता आहे.**



“ पिंपरी-चिंचवड, पुणे परिसराची ओळख आंतरराष्ट्रीय पातळीवर आयटी आणि इंडस्ट्रिअल हब अशी आहे. मात्र, हिंजवडी आयटी पार्क आणि चाकण औद्योगिक क्षेत्र समस्यांच्या विळख्यात आहे. यामुळे आयटी कंपन्या आणि औद्योगिक कंपन्या त्रस्त असून, सर्वसामान्य वाहनचालक, कर्मचारी यांना प्रचंड गैरसोईचा सामना करावा लागतो. वाहतूक सक्षम नसल्यामुळे अपघातांची संख्या वाढलेली आहे. याबाबत पावसाळी अधिवेशनामध्ये राज्य सरकारचे लक्ष वेधले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक घेतली आणि हिंजवडी समस्या मुक्तीच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. आता चाकण औद्योगिक पट्टा समस्यामुक्त करण्यासाठी पाठपुरावा करणार आहोत. #

- **महेश लांडगे, आमदार,** भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

त्याकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीमध्ये बैठक घेण्यासाठी पुढाकार घेण्यात येईल, असे आश्वासन भाजपा आमदार महेश लांडगे यांनी दिले. चाकण औद्योगिक पट्टयात वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. यावर राज्य सरकारकडे दाद मागण्यासाठी औद्योगिक कंपन्यांचे प्रतिनिधी संघटनांनी “UNCLOG Chakan MIDC” ही मोहीम हाती घेतली आहे. या मोहीमेला आमदार लांडगे यांनी पाठिंबा दिला आहे.

दरम्यान, संघटनांचे प्रतिनिधी आणि आमदार लांडगे यांची बैठक घेण्यात आली. यावेळी चाकण इंडस्ट्रिअल फेडरेशनचे सीईओ दिलीप बटवाल, चाकण इंडस्ट्रिअल असोसिएशनचे जीएम सुधीर मित्तल, चाकण एमआयडीसी इंडस्ट्रिअल असोसिएशनचे संस्थापक जयदेव अक्कलकोटे, अतुल इनामदार, ट्रॅफीकमुक्त चाकण कृती समितीचे प्रशांत टोपे, श्रीरंग कुलकर्णी, विनोद पाटील, रुपेश भंडारे, मनोजकुमार गायकवाड, विनोद पवार, राजेश जेजुरकर, अतुल शिंदे, अविनाश गोसावी, विजय पाटील, कुणाल कड, प्रमोद शिंदे, प्रसाद हरमन, प्रतिक जाधव, विनायक अलवेकर, नितीन जिवाडे आदी उपस्थित होते.

आमदार लांडगे म्हणाले की, चाकण औद्योगिक क्षेत्र समस्यामुक्त करण्यासाठी सर्वोतोपरी पाठपुरावा करणार आहोत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्यासोबत औद्योगिक कंपन्यांचे शिष्टमंडळ घेवून हिंजवडी आयटी पार्क समस्यामुक्तीसाठी ज्या प्रमाणे बैठक घेतली आणि कामाला गती दिली. त्याचप्रमाणे चाकण औद्योगिक पट्टा समस्यामुक्त करण्यासाठी पुढाकार घेणार आहे.

### बैठकीतील प्रमुख मुद्दे

1. मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्यासोबत बैठक नियोजित करणे.
2. भूसंपादन आणि रस्ता रुंदीकरणाचा प्रश्न मार्गी लावले. त्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत पाठपुरावा.
3. एमआयडीसी आणि चाकण औद्योगिक पट्टयातील रस्त्यांना अडथळा ठरणारी अतिक्रमणे हटवणे.
4. स्पायसर चौक : भूसंपादन झाले आहे. मात्र, रस्त्याचे काम आणि चौक प्रशस्त करणे.
5. MIDC ते फेज-2, साडुंबारे, खालींबरे, मिसिंग लिंक्स काम पूर्ण करणे.
6. कॉर्निग कंपनी ते पुणे-नाशिक महामार्गाच्या कामाला गती देणे.
7. प्रस्तावित रस्त्यांची यादी तयार करणे आणि पाठपुरावा नियोजन करावे. रस्त्यावरील खड्डे बुजवणे.
8. अवजड वाहनांसाठी पार्किंग सुविधा करावी. वाहतूक कोंडीच्या ठिकाणी ‘रेड स्पॉट’ निश्चित करणे. त्यावर कार्यवाहीचा ‘ॲक्शन प्लॅन’ करावा.
9. हिंजवडी आयटी पार्कप्रमाणे चाकण एमआयडीसीठी “सिंगल पॉईंट ॲथॉरिटी” निश्चित करणे.
10. अडथळा ठरणारे MSEB चे पोल हटवण्यासाठी नियोजन करणे.

## मोशी रुग्णालयाचे 35 टक्के काम पूर्ण

## दीड वर्षात काम पूर्ण होणार; रुग्णालयासाठी तब्बल 340 कोटींचा खर्च होणार

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेच्या वतीने मोशी येथे ७०० खाटांचे रुग्णालय उभारण्यात येत असून आतापर्यंत इमारतीचे ३५ टक्के काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे रुग्णालयासाठी नागरिकांना आणखी दीड वर्षाची प्रतीक्षा करावी लागणार आहे.**

५ एकर जागेमध्ये उभारण्यात येणाऱ्या रुग्णालयाच्या कामासाठी तब्बल ३४० कोटींचा खर्च करण्यात येणार आहे. हे रुग्णालयात सुरू झाल्यानंतर वायसीएम रुग्णालयावर येणारा ताण कमी होऊन वाढत्या लोकसंख्येला आधुनिक आरोग्य सुविधा मिळणार असल्याचा दावा महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केला आहे. शहराची वाढती लोकसंख्या आणि यामुळे रुग्णसेवेवर येणारा ताण लक्षात घेऊन महापालिकेच्या वतीने मोशीत ७०० खाटांचे रुग्णालय उभारण्यात येत आहे. ५७ हजार ४५० चौरस मीटर इतके बांधकाम क्षेत्र असलेल्या तळमजला आणि ८ मजली इमारतीसह उभारल्या जाणाऱ्या यारुग्णालयाचे आराखडे अत्याधुनिक आणि सुसज्ज वैद्यकीय कॅम्पसला दृष्टिक्षेपात ठेवून तयार करण्यात आले आहेत. यामध्ये भविष्यातील शैक्षणिक व निवासी पायाभूत सुविधांचाही समावेश करण्यात येणार आहे. सद्यःस्थितीत तळमजल्याचे काम पूर्ण झाले असून, तिसऱ्या मजल्यापर्यंतचे बांधकाम पूर्णत्वाकडे आल्याची माहिती कार्यकारीअभियंता विजय भोजने यांनी दिली. रुग्णालय परिसरात २७४ चारचाकी, तर २५० दुचाकी वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. आपत्कालीन सेवा, ओपीडी, रेडिओलॉजी, डायग्नोस्टिक, बालरोग, स्त्रीरोग, मानसिक आरोग्य, डे-केअर यांसारख्या विभागांचे नियोजन केले आहे. आयसीयू, डायलिसिस, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर, वॉर्ड्स, स्पेशल रूम्स असणार आहेत. हरित व ऊर्जा कार्यक्षम रचनेसाठी २०० केएलडी क्षमतेचा सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प, २०० किलोवॅट क्षमतेचे रूफटॉप सोलर पॅनल्स, पावसाळी पाण्याचे संकलन, एलईडी लाईट्स, एएसी ब्लॉक बांधकाम, सेंद्रिय कचरा प्रक्रिया यंत्रणा उभारण्यात येणार आहे.

“ मोशीतील हे बहुविध सुविधा असलेले आधुनिक रुग्णालय केवळ शहरातील आरोग्यसेवेच्या नव्या पर्वाची सुरुवात ठरेल. यामुळे सामान्य रुग्णांना त्वरित आणि दर्जेदार सेवा मिळतीलच, पण वैद्यकीय शिक्षणासाठी आवश्यक पायाभूत सुविधा देखील उभारण्यात येत आहेत. संपूर्ण प्रकल्पाचा वेग, गुणवत्ता आणि भविष्यातील गरजांचा विचार करता, हे रुग्णालय एक आदर्श मॉडेल ठरेल.

**-विजयकुमार खोराटे,** अतिरिक्त आयुक्त

“ " मोशीतील रुग्णालय केवळ एक आरोग्य सुविधा नसून, हे पिंपरी-चिंचवडच्या आरोग्यदृष्ट्या शाश्वत भविष्यासाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. या प्रकल्पाचे काम नियोजित वेळापत्रकानुसार सुरू असून, पर्यावरणस्नेही व ऊर्जा कार्यक्षम रचनांसह उच्च दर्जाच्या आरोग्य सेवा देण्याचा आमचा निर्धार आहे.

**-प्रमोद ओंभासे,** मुख्य अभियंता




# आणखी काय आंधळे होणे बाकी आहे?

**गाझामध्ये घडत असलेल्या उलथापालथीबाबतचे मौन पॅलेस्टिनी लोकांवर होणाऱ्या अत्याचाराच्या प्रमाणात वाढत असल्याचे दिसून येते. तिथे जे काही घडते आहे ते पाहता मानवी समाजाची नैतिक अधोगती सुरू आहे.**

या पद्धतीने, एवढ्या मोठ्या प्रमाणात अत्याचार होता कामा नयेत, असे एकेकाळी मान्य करणारे, मानवतावादी संवेदनशील भूमिकेचा आग्रह धरणारे आंतरराष्ट्रीय कायद्याची धार आता हळूहळू कमी होत चालली आहे.



या भयावह प्रकाराला कायदेशीर आणि नैतिक पातळीवर नेमके काय म्हणायचे, यावर सध्या चर्चा सुरू आहे. तरीही विरोधाभास असा की, हे अत्याचार प्रत्यक्ष दिसणार कसे नाहीत, याचीही अधिकाधिक काळजी घेतली जात आहे. यापुढच्या काळात कधीही युद्धविरामाची घोषणा झाली, तरीही तो उशीरच असेल. मोठ्या प्रमाणात मृत्यू आणि विनाश झाल्यानंतरच जगाचा विवेक जागा होईल आणि जे काही उरेल त्याला 'शांतता' म्हटले जाईल. पण गाझामधल्या या असल्या शांततेचे सखोल विश्लेषण करण्याची गरज आहे. कदाचित मानवतेकडून नैतिक प्रगतीची अपेक्षा करणे हेच मुळात भोळसटपणाचे असावे. ब्रूस रॉबिन्सने ATROCITY: A LITERARY HISTORY या ग्रंथात मांडले आहे की, अत्याचारांबाबत नैतिक संताप व्यक्त करणे हे इतिहासातही फारसे कधी घडलेले नाही. मानवी इतिहासात बहुतांश काळात हिंसेकडे हवामानाकडे बघतो तसेच बघितले गेले आहे. म्हणजे हवामान जसे काहीसे क्रूर, नित्याचे आणि नैतिक पातळीवर नोंद घेण्यासारखे नसते, तसेच इतिहासात हिंसेकडे बघतले गेले आहे.

त्यामुळे इतिहासकाळात निरपराध नागरिकांची हत्या ही सामान्य बाब होती, आणि बरेचदा पीडितांनीही स्वतःकडे अन्याय सहन करणारे म्हणून नाही तर केवळ पराभूत म्हणूनच पाहिले. अनेकदा तर सामूहिक हिंसेकडे मोक्षदायी म्हणूनही बघितले गेले आहे.रॉबिन्स यांच्या चिंतनातून मानवजातीने अत्याचारांचा थेट सामना करण्यापासून स्वतःला वाचवण्यासाठी स्वीकारलेल्या अनेक पळवाटांचा पर्दाफाश केला आहे. नैतिक अपेक्षा क्वचितच सामूहिक अस्मितांवर मात करतात. अत्याचारांवर टीका होते तेव्हाही त्या टीकेला अनेक मर्यादा असतात. या टीकेने विद्यमान सत्तारचनेला अस्थिर करू नये, ही अट गृहित धरलेलीच असते. रूढीवादी लोकांना सामूहिक हिंसेची भीती असते ती मानवहानी होईल म्हणून नाही, तर या हिंसेमुळे सामाजिक सुव्यवस्थेला धक्का बसेल म्हणून. कोणत्याही समाजाला स्वतःचे दोष मान्य करायला फारसे आवडत नाही. स्वतःवरचे आरोप सहन करणे हे मानसिकदृष्ट्या कठीण असते. कोणत्याही लेखकाच्या साहित्यात कितीही मोठ्या प्रमाणात हिंसाचार असला तरी, त्याला किंवा त्याच्यासारख्या अनेक अनेक लेखकांना आपल्या स्वतःच्या समाजाला अत्याचारांबद्दल जाब विचारणे कठीण जाते. आजच्या काळात आपण अशा जगात जगत आहोत जिथे एखादा नैतिक पातळीवर चिंता व्यक्त करत असेल तर त्याच्या या भूमिकेवरच शंका घेतली जाते. या भूमिकेचे विकृतीकरण केले जाते. अत्याचारांविषयी बोलणाऱ्या लोकांकडे सजग नागरिक म्हणून न पाहता स्वतःला नैतिकदृष्ट्या श्रेष्ठ समजणारे, दुसऱ्यांना अपराधी ठरवणारे लोक म्हणून पाहिले जाते. अशा चर्चेचा उद्देश इतरांवर नैतिक दडपण आणणे, आपलीच श्रेष्ठता दाखवणे, असा असतो असे गृहित धरले जाते. लोक आपल्या समूहाच्या, धर्माच्या, जातीच्या, राष्ट्राच्या किंवा इतर सामूहिक अस्मितांच्या निष्ठेत अडकतात, तेव्हा व्यापक नैतिकतेसाठी जागा उरत नाही. तो पाया संकुचित होत जातो.गाझामध्ये जे काही होते आहे, त्याला सक्रीय विरोध करून शांततेची मागणी करणाऱ्या एकातरी देशाचे उदाहरण आहे का? अमेरिका केवळ आपल्या देशातच नाही, तर जागतिक पातळीवरही गाझाविषयीच्या वक्तव्यांवर बंदी घालू पाहते. संयुक्त राष्ट्रातील अधिकाऱ्यांवर निर्बंध घालण्यात आले आहेत, तुम्ही 'चुकीच्या बाजूला' आहात असे समजले जाते. पश्चिम आशियातील देशही इस्रायलवर टीका होऊ देत नाहीत. झालीच तर ती नियंत्रित करतात. ऑस्ट्रेलिया सध्या ज्यूविरोधाची (अँटी-सेमिटिझम) अशी व्याख्या स्वीकारण्याच्या विचारात आहे, जी 'द एज' या वर्तमानपत्रात रिचर्ड फ्लॅनगन यांनी नमूद केलं आहे.

## संपादकीय »

### युगान्त... मिगान्त!

***दोन्ही शत्रूंचा सामना कधीही करावा लागेल, याची छोटी झलक ऑपरेशन सिंदूरच्या निमित्ताने मिळालीच आहे. तसे झाल्यास भारताला ४२ तुकड्या उड्डाणक्षम अवस्थेत असणे आवश्यक***

अंबाला हवाई तळावर १९६३मध्ये 'मिग – २१' या रशियन बनावटीच्या स्वनातीत लढाऊ विमानांच्या पहिल्या तुकडीचे आगमन झाले, त्या वेळी उपस्थितांपैकी अनेकांचे डोळे विस्फारलेले होते. तोपर्यंत अर्थातच त्यांच्यातील बहुतेकांनी असे अजब विमान पाहिलेले नव्हते. शिवाय प्राधान्याने भूदलकेंद्री असलेल्या त्या वेळच्या भारतीय सामरिक परिप्रेक्ष्यामध्ये स्वनातीत लढाऊ विमानांचे नेमके स्थान काय, याविषयीदेखील अनिश्चितता होती.

परंतु भारताच्या सीमावर्ती भागांवर स्वामित्व सांगून तो बळकावण्याची मनीषा बाळगलेले दोन कुरापतखोर शेजारी भारताला जन्मजात लाभलेले असल्यामुळे 'असे काही विमान' हाताशी हवेच, असा विचार त्या वेळच्या राजकीय आणि कदाचित लष्करी नेतृत्वाने केला असावा.

यंदाच्या अर्थसंकल्पात लोकानुनयी घोषणा असतील, ही अपेक्षा खोटी ठरवून देश मजबूत करण्यासाठी सिमेंट, ऊर्जानिर्मिती, कोळसा या उद्योगांना तसेच अन्य नवउद्योगांना मदतगार ठरणारे निर्णय सरकारने घेतले. गरीबांसाठी सौरऊर्जा, घरांसाठी साह्य आणि आरोग्य विम्यासारख्या सुविधांची व्याप्ती वाढवण्याचा विचारही यंदा दिसून आला.

## लोकानुनय नव्हे; देशाची उभारणी!

दशकभरापूर्वी वित्तभांडवलाच्या जागतिक क्षेत्रात कायकाय कूट-शब्द वापरले जात, हे जरा आठवून पाहा- 'फ्रॅजाइल फाइव्ह' आणि 'पीआयआयजीएस' म्हणजे 'पीग्ज' हे चटकन आठवतील. यापैकी दुसरा शब्द हा मुख्यत: युरोपातल्या कर्जबाजारी देशांसाठी वापरला गेला, पण अतिनाजूक पाचांमध्ये (फ्रॅजाइल फाइव्ह) भारताचाही समावेश त्या वेळी केला जाई. कारण, ज्या अर्थव्यवस्था नुकत्या वाढू लागलेल्या असूनही इतरांवर फार अवलंबून होत्या आणि त्यामुळे बेभरवशी होत्या, त्यात आपणही मोजले जात होतो- हे सारे, द्रष्टे अर्थशास्त्रज्ञ पंतप्रधानपदी असताना आणि त्यांचे अर्थमंत्रीसुद्धा बुद्धिवंत असताना होत होते. या खिन्न अवस्थेतून आणि आर्थिक स्तब्धतेपासून ते 'जगातील एकमेव उज्ज्वल स्थाना'पर्यंतच्या प्रवासाचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या सहकाऱ्यांना दिले पाहिजे. पुढील काही महिन्यांत आपण सार्वत्रिक निवडणुकांना सामोरे



जात असताना, अर्थव्यवस्थेची हाताळणी हा पंतप्रधानांच्या प्रगतीपुस्तकातील सर्वात तेजस्वी तारा आहे. हा आर्थिक संदर्भ आणि त्यातून येणारा राजकीय आत्मविश्वास यंदाच्या लेखानुदानातही (हंगामी अर्थसंकल्पातही) दिसून आला.लोकानुनयी अर्थसंकल्पाचीच अपेक्षा साऱ्यांना असूनसुद्धा, भारताचे दीर्घकालीन फायदे शीर्षस्थानी ठेवण्याच्या आपल्या ध्येयावर सरकार यंदा ठाम राहिले. याला हे देऊ कर, त्या गटाला ते आश्वासन दे, अशा अल्प-मुदतीच्या निवडणूक लाभांच्या दबावाखाली हे लेखानुदान आलेले नाही. याउलट, विकसित भारताचा मार्ग ज्या पायावर भक्कमपणे उभारला जाईल, असा पायाच लेखानुदानाने मजबूत केलेला आहे. गेल्या दहा वर्षांच्या काळात, शाश्वत आर्थिक विकास साधण्यासाठी आवश्यक संरचनात्मक बदल दिसून आले आहेत. त्यातही विशेष म्हणजे पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर केंद्र सरकारने लक्ष केंद्रित केले आहे. या पायाभूत सुविधा फक्त अभियांत्रिकीपुरत्या नसून सामाजिक आणि डिजिटलही आहेत. ताज्या अर्थसंकल्पातही हे सूत्र कायम राहिले आहे. पायाभूत सुविधांवरील खर्चात आणखी ११.११ टक्क्यांनी वाढ करण्याचा प्रस्ताव आहे, परिणामी ११.११लाख कोटी रुपये या क्षेत्राला मिळणार असून, पायाभूत सुविधांमध्येही यंदा रेल्वेवर भर देण्यात आला आहे. बंदरांशी जोडलेली वाहतूक-व्यवस्था, अत्यंत वर्दळीची रहदारी हे लक्षात घेऊन आणि ऊर्जा, खनिजे आणि सिमेंट क्षेत्रांसाठी उभारले जाणारे रेल्वेचे खास कॉरिडॉर मालवाहतुकीचा दर्जा आणि वेग सुधारतील.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मुक्त व्यापार करारामुळे वस्त्रोद्योगात चैतन्य!

## ब्रिटनबरोबरची निर्यात दुप्पट होण्याचा आशावाद

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारत आणि ब्रिटन यांच्यातील ऐतिहासिक मुक्त व्यापार करारावर (एफटीए) शिक्कामोर्तब झाल्यानंतर सर्वाधिक फायदा हा भारतीय वस्त्रोद्योगाला होणार असून, ब्रिटनला होणारी निर्यात दुप्पट होण्याचा संकेत उद्योजकांकडून मिळत आहे. विशेषत: कापूस व कापडनिर्मितीत अग्रस्थानी असलेल्या महाराष्ट्रातील वस्त्रोद्योजकांना ब्रिटनमधील निर्यात वाढवण्याची संधी मिळणार असल्याची भावना या उद्योजकांमधून व्यक्त होत आहे.**



भारत आणि ब्रिटन यांच्यातील या दोन्ही देशांतील उद्योग, व्यापार वाढीस लागावा यासाठी प्रयत्न सुरू होते. सुमारे तीन वर्षांच्या वाटाघाटींनंतर दोन्ही देशांतील ऐतिहासिक मुक्त व्यापार करारावर मान्यतेची मोहोर उमटली आहे. या कराराचा भारतातील कापड, अभियांत्रिकी वस्तू, वाहनांचे सुटे भाग, सागरी उत्पादने, चामडे, पादत्राणे, क्रीडा वस्तू, खेळणी, रत्ने, दागिने यांसारख्या कामगारकेंद्रित उद्योगांना नवीन संधींचे दरवाजे उघडण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.भारतातील वस्त्रोद्योग निर्यातवाढीला या कराराचा चांगलाच लाभ होणार असल्याचे संकेत आहेत. कापड आणि वस्त्र प्रावरणे यांच्या जागतिक व्यापारात भारताचा वाटा ३.९ टक्के आहे. भारतातून अमेरिका, युरोपीय महासंघ, संयुक्त अरब महासंघाला प्रामुख्याने कापड आणि पोशाख निर्यात केले जातात. कापड आणि वस्त्र प्रावरणातील एकूण निर्यातीमध्ये हा वाटा ४७ टक्के आहे.भारत सध्या ब्रिटनचा बारावा सर्वांत मोठा व्यापारी भागीदार आहे. ब्रिटनला कपडे आणि घरगुती कापडाच्या निर्यातीमध्ये भारत पाचव्या स्थानावर आहे. २०२४ मध्ये भारताने ब्रिटनला १.४ अब्ज डॉलरची वस्त्रे आणि घरगुती कापडाची निर्यात केली होती.

ब्रिटनच्या एकूण आयात कापडातील हा वाटा ६.६ टक्के आहे.लिनन कापड उत्पादक यंत्रमागधारक, पीडीक्सेलचे (पॉवरलूम डेव्हलपमेंट अँड प्रमोशन कौन्सिल) संचालक गजानन होगाडे यांनी सांगितले, की हा करार यंत्रमागधारक कापडउत्पादक, निर्यातदारांसाठी मोठ्या संधीचे पर्व आहे. भारतातून टी-शर्ट, महिलांचे व बाळांचे कपडे यांसारखे कापसावर आधारित कपडे ब्रिटनला निर्यात करण्याची संधी वाढणार आहे. भारताला ब्रिटनमध्ये कापड, तयार कपडे निर्यात करण्याची संधी वाढणार असली, तरी भारताला शेजारच्या आशियाई देशांशी स्पर्धा करावी लागणार आहे. भारतातून आयात होणाऱ्या वस्त्रावर आणि घरगुती कापडावर ब्रिटनकडून ८ ते १२ टक्के शुल्क आकारले जायचे. पण आता कापडासह ९९ टक्के भारतीय वस्तूंवरील आयातशुल्क ब्रिटनकडून रद्द करण्यात आल्यामुळे निर्यातीचे प्रमाण वाढणार आहे.२०२४ मध्ये वस्त्रोद्योग आणि घरगुती कापड ब्रिटनला चीनकडून सर्वाधिक म्हणजे २५ टक्के निर्यात करण्यात आले होते.

पाठोपाठ बांगलादेश (२२ टक्के), तुर्की (८ टक्के) आणि पाकिस्तान (६.८ टक्के) यांचा क्रमांक आहे. त्यामुळे या देशांशी भारताला स्पर्धा करावी लागणार आहे.भारत आणि ब्रिटन सरकारने या ऐतिहासिक करारावर स्वाक्षरी केल्याने दोन्ही देशांमध्ये व्यापार, गुंतवणूक आणि सेवा क्षेत्रात नव्या आणि आकर्षक संधी निर्माण होणार आहेत. या अनुकूल वातावरणामुळे महाराष्ट्रातील वस्त्रोद्योग निर्यात लक्षणीय प्रमाणात वाढणार आहे. भारत आणि ब्रिटन यांच्यातील या दोन्ही देशांतील उद्योग, व्यापार वाढीस लागावा यासाठी प्रयत्न सुरू होते. सुमारे तीन वर्षांच्या वाटाघाटींनंतर दोन्ही देशांतील ऐतिहासिक मुक्त व्यापार करारावर मान्यतेची मोहोर उमटली आहे.

### निर्यातीमध्ये भारत पाचव्या स्थानावर

या कराराचा भारतातील कापड, अभियांत्रिकी वस्तू, वाहनांचे सुटे भाग, सागरी उत्पादने, चामडे, पादत्राणे, क्रीडा वस्तू, खेळणी, रत्ने, दागिने यांसारख्या कामगारकेंद्रित उद्योगांना नवीन संधींचे दरवाजे उघडण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.भारतातील वस्त्रोद्योग निर्यातवाढीला या कराराचा चांगलाच लाभ होणार असल्याचे संकेत आहेत. कापड आणि वस्त्र प्रावरणे यांच्या जागतिक व्यापारात भारताचा वाटा ३.९ टक्के आहे. भारतातून अमेरिका, युरोपीय महासंघ, संयुक्त अरब महासंघाला प्रामुख्याने कापड आणि पोशाख निर्यात केले जातात. कापड आणि वस्त्र प्रावरणातील एकूण निर्यातीमध्ये हा वाटा ४७ टक्के आहे.भारत सध्या ब्रिटनचा बारावा सर्वांत मोठा व्यापारी भागीदार आहे. ब्रिटनला कपडे आणि घरगुती कापडाच्या निर्यातीमध्ये भारत पाचव्या स्थानावर आहे.

# खांदेरी किल्ल्याजवळ मासेमारी बोट बुडाली

## तीन जण बेपत्ता असून, पाच जण पोहत किनाऱ्याला आले

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**खांदेरी किल्ल्याजवळ उरण येथील एक मासेमारी बोट बुडाली आहे. ज्यातील तीन जण बेपत्ता असून, पाच जण पोहत किनाऱ्याला आले आहेत. उरण तालुक्यातील करंजा येथील मनोहर गणपत कोळी यांच्या मालकीची तुळजाई नावाची मच्छीमार बोट आज सकाळी ७ वाजता समुद्रात मासेमारीसाठी निघाली.**



सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास खांदेरी किल्ल्याजवळ आली असता ही बोट लाटांच्या जोरदार माऱ्याने बुडाली. बोटीवरील ५ खलाशांनी ९ तास पोहत संध्याकाळी किनारा गाठला. तर अन्य तीन जण बेपत्ता आहेत. मांडवा सागरी पोलीस अधिक तपास करीत आहेत.हेमंत बळीराम गावंड रा. आवरे, संदीप तुकाराम कोळी रा. करंजा, रोशन भगवान कोळी रा. करंजा, शंकर हिरा भोईर रा. आपटा, कृष्णा राम भोईर रा. आपटा असे पोहत किनाऱ्यावर आलेल्या खलांशींची नावे आहेत. तर नरेश राम शेलार, धीरज कोळी आणि मुकेश यशवंत पाटील हे तिघे खलाशी बेपत्ता आहेत. त्यांचा ड्रोनच्या मदतीने शोध सुरू करण्यात आला आहे. मासेमारी बंदी असताना ही बोट मासेमारीसाठी गेली होती.सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास खांदेरी किल्ल्याजवळ आली असता ही बोट लाटांच्या जोरदार माऱ्याने बुडाली. बोटीवरील ५ खलाशांनी ९ तास पोहत संध्याकाळी किनारा गाठला. तर अन्य तीन जण बेपत्ता आहेत. मांडवा सागरी पोलीस अधिक तपास करीत आहेत.हेमंत बळीराम गावंड रा. आवरे, संदीप तुकाराम कोळी रा. करंजा, रोशन भगवान कोळी रा. करंजा, शंकर हिरा भोईर रा. आपटा, कृष्णा राम भोईर रा. आपटा असे पोहत किनाऱ्यावर आलेल्या खलांशींची नावे आहेत. तर नरेश राम शेलार, धीरज कोळी आणि मुकेश यशवंत पाटील हे तिघे खलाशी बेपत्ता आहेत.

### 9 तास पोहत किनारा गाठला

त्यांचा ड्रोनच्या मदतीने शोध सुरू करण्यात आला आहे. मासेमारी बंदी असताना ही बोट मासेमारीसाठी गेली होती.खांदेरी किल्ल्याजवळ उरण येथील एक मासेमारी बोट बुडाली आहे. ज्यातील तीन जण बेपत्ता असून, पाच जण पोहत किनाऱ्याला आले आहेत. उरण तालुक्यातील करंजा येथील मनोहर गणपत कोळी यांच्या मालकीची तुळजाई नावाची मच्छीमार बोट आज सकाळी ७ वाजता समुद्रात मासेमारीसाठी निघाली. सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास खांदेरी किल्ल्याजवळ आली असता ही बोट लाटांच्या जोरदार माऱ्याने बुडाली. बोटीवरील ५ खलाशांनी ९ तास पोहत संध्याकाळी किनारा गाठला.हेमंत बळीराम गावंड रा. आवरे, संदीप तुकाराम कोळी रा. करंजा, रोशन भगवान कोळी रा. करंजा, शंकर हिरा भोईर रा. आपटा, कृष्णा राम भोईर रा. आपटा असे पोहत किनाऱ्यावर आलेल्या खलांशींची नावे आहेत.

# राहुलच्या नशिबात माफी मागणं लिहिलंय

## शिवराज सिंह चौहान यांनी राहुल गांधीवर जोरदार टीका केली



**। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।** काँग्रेसचे नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी दिल्लीमधील एका कार्यक्रमात बोलताना शुक्रवारी ओबीसींच्या मुद्यांवर बोलताना महत्वाचं भाष्य केलं. यावेळी बोलताना राहुल गांधींनी एक चूक झाल्याचं म्हणत ती चूक आता सुधारायची असल्याचं म्हटलं. जातनिहाय जनगणना न करणं ही माझी चूक होती, आपल्याला याबाबत पश्चात्ताप आहे. पण आता चूक सुधारायची आहे, असं राहुल गांधी यांनी म्हटलं होतं.

दरम्यान, राहुल गांधी यांच्या या विधानावर बोलताना भाजपाचे नेते तथा देशाचे कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी जोरदार टीका केली आहे. 'राहुल गांधींच्या नशिबात कायमच माफी मागणं लिहिलंय', असं म्हणत आता राहुल गांधी जे करत आहेत त्यासाठी पुन्हा पुढच्या १० वर्षांनी माफी मागतील असा घणाघातही कृषीमंत्री चौहान यांनी केला.राहुल गांधी यांना खूप उशिरा समजते. आधी राहुल गांधींनी आणीबाणीसाठी माफी मागितली. त्यानंतर त्यांनी शीख दंगलींच्या प्रकरणासंदर्भात माफी मागितली. त्यानंतर आता राहुल गांधींनी ओबीसींची माफी मागितली. काँग्रेसने ओबीसींसाठी काय केलं? ओबीसींच्या कल्याणासाठी काँग्रेसने काम केलं नाही उलट ओबीसींना चिरडण्याचं काम काँग्रेसने केलं. तसेच राफेल प्रकरणातही राहुल गांधी यांनी माफी मागितली. आता राहुल गांधी जे करत आहेत त्यासाठी १० वर्षांनी ते पुन्हा माफी मागतील. राहुल गांधी कधीही योग्य काम करत नाहीत आणि नंतर दहा वर्षांनी माफी मागतात. त्यामुळे राहुल गांधींच्या नशिबात कायमच माफी मागणं लिहिलेलं आहे", अशी टीका कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केली आहे.मी २००४ पासून राजकारणात आहे. जेव्हा मागे वळून पाहतो आणि आत्मचिंतन करतो तेव्हा कुठे योग्य काम केलं आणि कुठे नाही हे उमजतं. माझ्या दृष्टीने दोन ते तीन मुद्दे महत्त्वाचे आहेत. भूसंपादन विधेयक, मनरेगा, खाद्यान्न विधेयक, आदिवासींसाठी लढा. या गोष्टी मी चुकीच्या केल्या. तथापि, दलित, आदिवासी आणि अल्पसंख्याकांचा विचार केला तर मला चांगले गुण मिळायला हवे", असं राहुल गांधींनी म्हटलं होतं. ओबीसींचं रक्षण जसं करायला हवं होतं, तसं केलं नाही. मी कमी पडलो. कारण त्यावेळी मी तुमचे मुद्दे खोलवर समजू शकलो नाही. पण मला आता वाईट वाटतं की जर मला तुमच्या (ओबीसी) इतिहासाबद्दल, तुमच्या समस्यांबद्दल थोडं जास्त माहिती असतं तर मी त्यावेळी जातीय जनगणना केली असती. ही माझी चूक होती. ही काँग्रेस पक्षाची चूक नाही, ती माझी चूक आहे. मात्र, आता मी ती चूक सुधारणार आहे", असं राहुल गांधींनी म्हटलं होतं.दरम्यान, राहुल गांधी यांच्या या विधानावर बोलताना भाजपाचे नेते तथा देशाचे कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी जोरदार टीका केली आहे. 'राहुल गांधींच्या नशिबात कायमच माफी मागणं लिहिलंय', असं म्हणत आता राहुल गांधी जे करत आहेत त्यासाठी पुन्हा पुढच्या १० वर्षांनी माफी मागतील असा घणाघातही कृषीमंत्री चौहान यांनी केला.राहुल गांधी यांना खूप उशिरा समजते. आधी राहुल गांधींनी आणीबाणीसाठी माफी मागितली. त्यानंतर त्यांनी शीख दंगलींच्या प्रकरणासंदर्भात माफी मागितली. त्यानंतर आता राहुल गांधींनी ओबीसींची माफी मागितली. काँग्रेसने ओबीसींसाठी काय केलं? ओबीसींच्या कल्याणासाठी काँग्रेसने काम केलं नाही उलट ओबीसींना चिरडण्याचं काम काँग्रेसने केलं. तसेच राफेल प्रकरणातही राहुल गांधी यांनी माफी मागितली. आता राहुल गांधी जे करत आहेत.

### 10 वर्षांनी ते पुन्हा माफी मागतील

त्यासाठी १० वर्षांनी ते पुन्हा माफी मागतील. राहुल गांधी कधीही योग्य काम करत नाहीत आणि नंतर दहा वर्षांनी माफी मागतात. त्यामुळे राहुल गांधींच्या नशिबात कायमच माफी मागणं लिहिलेलं आहे", अशी टीका कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केली आहे.मी २००४ पासून राजकारणात आहे. जेव्हा मागे वळून पाहतो आणि आत्मचिंतन करतो तेव्हा कुठे योग्य काम केलं आणि कुठे नाही हे उमजतं. माझ्या दृष्टीने दोन ते तीन मुद्दे महत्त्वाचे आहेत. भूसंपादन विधेयक, मनरेगा, खाद्यान्न विधेयक, आदिवासींसाठी लढा. या गोष्टी मी चुकीच्या केल्या. तथापि, दलित, आदिवासी आणि अल्पसंख्याकांचा विचार केला तर मला चांगले गुण मिळायला हवे", असं राहुल गांधींनी म्हटलं होतं.ओबीसींचं रक्षण जसं करायला हवं होतं, तसं केलं नाही. मी कमी पडलो.

# ब्रिटनबरोबर कराराचं मोदींनी केलं कौतुक

## ब्रिटनमधील मुक्त व्यापार करारामुळे जगाचा भारतावरील विश्वास



**। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शनिवारी तामिळनाडूमधील तब्बल ४,९०० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या अनेक विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन पार पडलं. जागतिक दर्जाच्या हवाई पायाभूत सुविधा विकसित करण्याच्या आणि कनेक्टिव्हिटी वाढवण्याच्या पार्श्वभूमीवर तब्बल ४५० कोटींच्या खर्चासह विकसित केलेल्या तुतीकोरिन विमानतळ टर्मिनलच्या इमारतीचे उद्घाटनही मोदी यांच्या हस्ते पार पडलं आहे.

मोदी यांनी तामिळनाडूमध्ये अभूतपूर्व विकासाबाबत भाष्य केलं. तसेच पंतप्रधान मोदी नुकतेच विदेश दौऱ्यावर होते. या दौऱ्यात झालेल्या भारत-ब्रिटनमधील मुक्त व्यापार करारावरही मोदींनी भाष्य केलं. बहुतांश उत्पादनांना ब्रिटिश बाजारपेठेत शुल्कमुक्त प्रवेश या करारामुळे मिळणार असल्याचं पंतप्रधान मोदींनी म्हटलं आहे. भारत आणि ब्रिटनमधील मुक्त व्यापार करारामुळे जगाचा भारतावरील विश्वास आणि देशाचा आत्मविश्वास दर्शवित असल्याचं सांगत मुक्त व्यापार कराराचं पंतप्रधान मोदींनी कौतुक केलं.आज आपण आपल्या प्रयत्नांद्वारे विकसित तामिळनाडू आणि विकसित भारताचं स्वप्न पुढे नेत आहोत. नुकतंच ब्रिटन आणि भारत यांच्यात एक मुक्त व्यापार करार झाला आहे. जो या स्वप्नाला गती देतो. या करारामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेलाही नवीन बळकटी मिळेल. जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याची आपली गती आणखी वेगवान होईल", असं मोदींनी म्हटलं आहे.तामिळनाडूच्या विकासासाठी भारत सरकार प्रयत्न करत आहे. तामिळनाडूमध्ये आम्ही विमानतळांसह विविध महामार्गांचा विकास करत आहोत. आज केलेल्या उद्घाटनांची कामे हे देखील याचाच एक भाग आहे. १७,३४० चौरस मीटर क्षेत्रफळावर पसरलेले हे टर्मिनल गर्दीच्या वेळी १,३५० प्रवाशांना आणि दरवर्षी २० लाख प्रवाशांसाठी सुसज्ज असेल

### दहशतवाद्यांच्या आकाची झोप उडाली

. तामिळनाडूचा विकास ही आमची मुख्य वचनबद्धता आहे. राज्याच्या प्रगतीशी संबंधित धोरणांना सातत्याने प्राधान्य दिलं गेलं. गेल्या दशकात केंद्र सरकारने मागील यूपीए सरकारच्या काळात दिलेल्या निधीच्या तुलनेत तिप्पट जास्त निधी तामिळनाडूला दिला", असं मोदींनी म्हटलं आहे.आज भारत सरकार मेक इन इंडिया आणि मिशन मॅन्युफॅक्चरिंगवर जोरदार भर देत आहे. तुम्ही सर्वांनी अलीकडेच ऑपरेशन सिंदूर दरम्यान 'मेक इन इंडिया'ची शक्ती पाहिली आहे. भारतात बनवलेल्या शस्त्रांनी दहशतवाद्यांची अड्डये नष्ट करण्यात मोठी भूमिका बजावली. भारतात बनवलेल्या शस्त्रांमुळे अद्याप देखील दहशतवाद्यांच्या आकाची झोप उडालेली आहेयांच्या हस्ते शनिवारी तामिळनाडूमधील तब्बल ४,९०० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या अनेक विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन पार पडलं.

# माधुरी माझ्यापेक्षा जास्त 'फेमस'; डॉ. नेने पत्नीविषयी काय म्हणाले?

माधुरी दीक्षितचे पती डॉ. श्रीराम नेनेंनी २०११ मध्ये अमेरिकेतील हार्ट सर्जनची नोकरी सोडून भारतात परण्याचा निर्णय घेतला होता. यंदाच्या जानेवारी महिन्यात आयएनकेच्या संस्थापक आणि सीईओ लक्ष्मी प्रॅटुरी यांनी आयोजित केलेल्या एका पॅनेलच्या चर्चेत डॉ. नेने सहभागी झाले होते. यावेळी त्यांनी वैयक्तिक आयुष्यातील बऱ्याच गोष्टींचा खुलासा केला. डॉ. नेनेंचा नोकरी सोडून भारतात येण्याचा निर्णय त्यांच्या आई-बाबांना त्यावेळी पटला नव्हता. याशिवाय माधुरीशी लग्न झाल्यानंतर आयुष्य पूर्णपणे बदलून गेलं असंही ते म्हणाले.डॉ. श्रीराम नेने UCLA ( कॅलिफोर्निया विद्यापीठ-लॉस एंजेलिस ) याठिकाणी हार्ट सर्जन म्हणून काम करायचे. त्यावेळी बऱ्याच सेलिब्रिटींवर उपचार केल्याचं त्यांनी सांगितलं. डॉ. नेने म्हणाले, "मी अनेक सेलिब्रिटींवर उपचार केले आहेत. माझं लग्न होण्याआधी सुद्धा मी बऱ्याच सेलिब्रिटींना ओळखायचो. पण, लग्नाआधी बाहेरच्या जगात मला फारसं कोणीही ओळखत नव्हतं. माधुरीशी लग्न झाल्यावर





परिस्थिती पूर्णपणे बदलली. आता प्रत्येकाला माझ्याबरोबर सेल्फी हवा असतो."डॉ. नेने पुढे म्हणाले, "माझी पत्नी माझ्यापेक्षा जास्त प्रसिद्ध आहे... आणि हे अगदी खरं आहे. मी फक्त जोडीदार म्हणून तिची साथ देतोय. वैयक्तिक आयुष्यात ती प्रचंड नम्र आहे. तिला त्यावेळी अमेरिकेत सुद्धा सर्वत्र ओळखलं जायचं. पण, मी कधीच तिच्याकडे एक अभिनेत्री म्हणून पाहिलं नाही कारण, ती माझी पत्नी आहे, माझी जोडीदार आहे. माधुरी दीक्षितचे पती डॉ. श्रीराम नेनेंनी २०११ मध्ये अमेरिकेतील हार्ट सर्जनची नोकरी सोडून भारतात परण्याचा निर्णय घेतला होता. यंदाच्या जानेवारी महिन्यात आयएनकेच्या संस्थापक आणि सीईओ लक्ष्मी प्रॅटुरी यांनी आयोजित केलेल्या एका पॅनेलच्या चर्चेत डॉ. नेने सहभागी झाले होते.

## रेखा आरतीला कानशिलात लगावणार

बॉलीवूड अभिनेत्रींमध्ये असलेलं बॉन्डिंग आणि त्यांच्यात असलेली भांडणं ही नेहमीच सोशल मीडियावर चर्चेत असतात. त्यांच्या चाहत्यांना नेहमीच अभिनेत्रींच्या खऱ्या आयुष्यात काय होतंय हे जाणून घेण्याची इच्छा होते. असाच एक किस्सा स्वत: अभिनेत्रीनं सांगितला होता, तेव्हा सगळ्यांना मोठा धक्का बसला होता. हा किस्सा दिग्गज अभिनेत्री रेखा यांच्या संबंधित आहे. आरती छाबडिया ही लोकप्रिय अभिनेत्री आहे. आरती छाबडियाने १९९९ मध्ये मिस इंडिया वर्ल्डवाइडचा किताबही जिंकला आहे. तिने सुखविंदर सिंग यांच्या 'नशा ही नशा है' या गाण्याने आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. यानंतर ती चित्रपटांमध्ये आली. तिने अनेक चित्रपटांमध्ये महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत.आरती छाबडिया आता सोशल मीडियावर फॅशन इन्फ्लुएन्सर म्हणून लोकप्रिय झाली आहे. आरतीनं 'लज्जा' सिनेमातून बॉलीवूडमध्ये एन्ट्री केली होती. या सिनेमात तिच्यासोबत माधुरी दीक्षित, अजय देवगण, रेखा यांच्यासह अनेक लोकप्रिय कलाकारांच्या भूमिका होत्या. या सिनेमाच्या सेटवरचा एक किस्सा सध्या चर्चेत आला आहे.एका सीनमध्ये आरतीला रेखा कानशिलात लगावणार होत्या, पण या गोष्टीची आरतीला कल्पना नव्हती. जेव्हा रेखा यांनी तिच्या कानाखाली मारली तेव्हा आरती ढसाढसा रडू लागली. या गोष्टीचा खुलासा स्वत: आरतीने एका मुलाखतीदरम्यान केला होता. तिने एका मुलाखतीत सांगितलं होतं की, 'लज्जा' चित्रपटाच्या सेटवर रेखा यांनी तिला कानाखाली मारली होती. रेखा यांनी शूटिंगदरम्यान तिला मारल्यानंतर ती ढसाढसा रडू लागली होती." आरतीची परिस्थिती पाहून सिनेमाचे दिग्दर्शक आणि रेखा यांनी तिला समजावलं होतं.

## काय माय जरातर लाजावं की...



नृत्यांगणा गौतमी पाटीलही तिच्या अदांनी आणि नृत्यांनी चात्यांना घायाळ करत असते. गौतमी वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये तिची नृत्यशैली सादर करते. कोणत्या ना कोणत्या कारणांमुळे गौतमी चर्चेत असते. आता गौतमीनं सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये ती "सरकार तुम्ही केलंय मार्केट जाम" या गाण्यावर डान्स करताना दिसत आहे. गौतमीचा हा व्हिडीओ पाहिल्यानंतर मात्र आता नेटकरी तिच्यावर भडकले आहेत. गौतमीच्या व्हिडीओला कमेंट करुन अनेकांनी तिला ट्रोल देखील केलं आहे. गौतमीनं इन्स्टाग्रामवर तिचा "सरकार तुम्ही केलंय मार्केट जाम" या गाण्यावरील डान्सचा व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये गौतमी ही स्टेजवर काही लहान मुलींसोबत डान्स करताना दिसत आहे. लहान मुलींसोबत डान्स केल्यानंतर काही नेटकरी गौतमीला ट्रोल करत आहेत. एका नेटकऱ्यानं गौतमीला कमेंट केली, "तू नाच आणि अजून तुझ्या पुढे 10 तयार कर नाचायला. काय माय जरातर लाजावं की. देशाच भविष्य नाचवताना." तर दुसऱ्या युझरनं कमेंट केली, "लहान मुली आहेत एवढी तरी आकल ठेवा" काही नेटकऱ्यांनी गौतमीच्या व्हिडीओला कमेंट करुन तिला ट्रोल केलं तर काहींनी तिच्या नृत्यशैलीचं कौतुक देखील केलं. गौतमीच्या माझा कारभार सोपा नसतोय रं, दिलाचं पाखरू, सरकार तुम्ही केलंय मार्केट जाम,पाटलांचा बैलगाडा या गाण्यांना प्रेक्षकांची विशेष पसंती मिळाली. तिच्या गाण्यांवर नेटकरी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव करतात. गौतमी तिच्या गाण्यांचे व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर करत असते. तिला इन्स्टाग्रामवर 1.5 मिलियन फॉलोवर्स आहेत. काही दिवसांपूर्वी गौतमीचं 'घोटाळा झाला' हे गाणं या युट्यूब चॅनलवर शेअर करण्यात आलं आहे. या गाण्याला देखील नेटकऱ्यांची पसंती मिळाली. तसेच तिचा 'घुंगरु' हा चित्रपट देखील रिलीज झाला.या चित्रपटाचं दिग्दर्शन बाबा गायकवाडयांनी केलं आहे.नृत्यांगणा गौतमी पाटील ही तिच्या अदांनी आणि नृत्यांनी चात्यांना घायाळ करत असते. गौतमी वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये तिची नृत्यशैली सादर करते. कोणत्या ना कोणत्या कारणांमुळे गौतमी चर्चेत असते.

## दत्तू मोरेने दिली आनंदाची बातमी!

'महाराष्ट्राची हास्यजत्रा' कार्यक्रमामुळे अनेक नवोदित कलाकार प्रसिद्धीझोतात आले. या शोचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. यापैकीच प्रेक्षकांचा लाडका अभिनेता म्हणजे दत्तू मोरे. दत्तूने नुकताच त्याच्या चाहत्यांना एक सुखद धक्का दिला आहे. लग्नानंतर दोन वर्षांनी अभिनेता बाबा झाला आहे. ही आनंदाची बातमी दत्तूने इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करत सर्वांना दिली आहे. दत्तूच्या घरी चिमुकल्या सदस्याचं आगमन झालेलं आहे. अभिनेत्याला मुलगा झाला आहे. दत्तूने बाळाची पहिली झलक या पोस्टद्वारे शेअर केली आहे. यातील एका फोटोमध्ये दत्तू अन् त्याच्या पत्नीने लेकाचा हात अलगद आपल्या हातांवर धरल्याचं पाहायला मिळत आहे. तर, दुसऱ्या एका फोटोमध्ये दत्तूच्या लेकाने चिमुकल्या हातांनी बाबाचं बोट पकडल्याचं दिसतंय.दत्तूने हे गोड फोटो शेअर करत त्यावर "फायनली... तो आला! WE NOW OFFICIALLY HAVE A TINY HUMAN TO BLAME. माझ्या आयुष्यातील सर्वात मोठा क्षण...मी सदैव कृतज्ञ आहे." असं कॅप्शन दिलं आहे.दत्तूने गुडन्यूज शेअर करताच नेटकऱ्यांसह अभिनेत्याच्या चाहत्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. हास्यजत्रेतील कलाकारांनी सुद्धा कमेंट्समध्ये दत्तूवर शुभेच्छांचा पाऊस पाडला आहे.दरम्यान, २३ मे २०२३ रोजी दत्तूने गुपचूप लग्नगाठ बांधत नव्या आयुष्याला सुरुवात केली होती. त्याचं लग्न साध्या पद्धतीत पार पडलं होतं.



## सारा 'या' अभिनेत्याला करतेय डेट?

भारतीय संघाचा महान फलंदाज सचिन तेंडुलकरची लेक नेहमीच चर्चेत असते. सारा तेंडुलकर सोशल मीडियावर प्रचंड सक्रिय असते आणि तिच्या फोटो, व्हीडिओवर चाहते लाईक्स, कमेंटसचा चाहते पाऊस पाडतात. सारा तेंडुलकरचं नाव भारताचा क्रिकेटपटू गिलबरोबर जोडलं जात होतं. आता पुन्हा एकदा साराचे नाव याच कारणामुळे चर्चेत आहे. साराचं नाव आता बॉलीवूडमधील अभिनेत्याबरोबर जोडलं जातं. या अभिनेत्याला सारा डेट करत असल्याचा दावा एका रिपोर्टमध्ये केला आहे. शुबमन गिल आणि सारा तेंडुलकर एकमेकांना डेट करत असल्याची नेहमीच चर्चा होत असते. पण आयपीएलदरम्यान शुबमन गिलच्या मुलाखतीतील एका वक्तव्यामुळे या चर्चेला पूर्णविराम मिळाला. गिलला मुलाखतीत त्याच्या वैयक्तिक जीवनाबद्दल विचारले असता त्याने सांगितलं की तो गेली ३ वर्ष सिंगल आहे आणि त्याच्या क्रिकेट करियरवर लक्ष देत आहे. गिलच्या मुलाखतीतील वक्तव्यापूर्वी गिल आणि साराने एकमेकांना इन्स्टाग्रामवर अनफॉलो केल्याने त्यांच्या ब्रेकअपच्या चर्चा होत्या. तर गिलच्या वक्तव्यामुळे या चर्चाही थांबल्या. आता सारा तेंडुलकरचं नाव बॉलीवूड अभिनेत्याबरोबर जोडलं जात आहे.फिल्मफेअरमधील एका वृत्तानुसार, दिग्गज भारतीय फलंदाजाची लेक सारा तेंडुलकर अभिनेता सिध्दांत चतुर्वेदीला डेट करत आहे.

# कर्णधार गिल इंग्लंडमध्ये चमकला!

## विराटला मागे टाकत बनला आशियातील नंबर 1 फलंदाज

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये सुरू असलेल्या चौथ्या कसोटीत इंग्लंडच्या फलंदाजांनी दमदार फलंदाजी केली. भारतीय संघाने पहिल्या डावात फलंदाजी करताना ३५८ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना इंग्लंडच्या फलंदाजांनी दमदार फलंदाजी केली. बेन स्टोक्स आणि जो रूटच्या शतकी खेळीच्या बळावर इंग्लंडने ६६९ धावांचा भलामोठा डोंगर उभारला. या धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाला सुरूवातीला २ मोठे धक्के बसले. पण त्यानंतर कर्णधार शुबमन गिल आणि केएल राहुलने मिळून भारतीय संघाचा डाव सांभाळला. यादरम्यान शुबमन गिलने एक मोठा विक्रम मोडून काढला आहे.**



शुबमन गिल या मालिकेत दमदार फॉर्ममध्ये आहे. मालिकेतील पहिल्या दोन्ही सामन्यांमध्ये त्याने दमदार शतकं झळकावली होती. त्यानंतर तिसऱ्या सामन्यात त्याला हवी तशी कामगिरी करता आली नव्हती. पण चौथ्या सामन्यात त्याला पुन्हा एकदा सूर गवसला आहे. या सामन्यातील पहिल्या डावात स्वस्तात माघारी परतल्यानंतर त्याने दुसऱ्या डावात महत्वपूर्ण खेळी केली. यासह तो इंग्लंडमध्ये कसोटी मालिका खेळताना सर्वाधिक धावा करणारा आशियातील पहिलाच फलंदाज ठरला आहे.शुबमन गिलने या विक्रमात पाकिस्तानचा माजी फलंदाज मोहम्मद युसूफचा विक्रम मोडून काढला आहे. मोहम्मद युसूफच्या नावे ६३१ धावा करण्याची नोंद होती. त्याने २००६ मध्ये इंग्लंडविरूद्ध खेळताना ७ डावात ६३१ धावा केल्या होत्या. या यादीत राहुल द्रविड तिसऱ्या स्थानी आहे.

२००२ मध्ये झालेल्या इंग्लंड दौऱ्यावर राहुल द्रविडने ६०२ धावा केल्या होत्या.तर विराट कोहलीने २०१८ मध्ये ५९३ धावा केल्या होत्या. सुनील गावसकर यांनी १९७९ मध्ये ५४२ धावा केल्या होत्या.यासह शुबमन गिलच्या नावे आणखी एका मोठ्या विक्रमाची नोंद झाली आहे. त्याने इंग्लंडविरूद्ध फलंदाजी करताना एकाच डावात कर्णधार म्हणून सर्वाधिक धावा करण्याच्या बाबतीत विराट कोहलीला मागे सोडलं आहे. कर्णधार म्हणून शुबमन गिलने ६६८ धावांचा पल्ला गाठला आहे. याआधी हा विक्रम भारताचा माजी कर्णधार विराट कोहलीच्या नावावर होता. विराट कोहलीने २०१६-१७ कसोटी मालिकेत ६५५ धावा केल्या होत्या.

इंग्लंडविरूद्ध सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम हा सुनील गावसकरांच्या नावावर आहे. लवकरच गिल हा विक्रम देखील मोडून काढू शकतो.शुबमन गिल या मालिकेत दमदार फॉर्ममध्ये आहे. मालिकेतील पहिल्या दोन्ही सामन्यांमध्ये त्याने दमदार शतकं झळकावली होती. त्यानंतर तिसऱ्या सामन्यात त्याला हवी तशी कामगिरी करता आली नव्हती. पण चौथ्या सामन्यात त्याला पुन्हा एकदा सूर गवसला आहे.

या सामन्यातील पहिल्या डावात स्वस्तात माघारी परतल्यानंतर त्याने दुसऱ्या डावात महत्वपूर्ण खेळी केली. यासह तो इंग्लंडमध्ये कसोटी मालिका खेळताना सर्वाधिक धावा करणारा आशियातील पहिलाच फलंदाज ठरला आहे.शुबमन गिलने या विक्रमात पाकिस्तानचा माजी फलंदाज मोहम्मद युसूफचा विक्रम मोडून काढला आहे. मोहम्मद युसूफच्या नावे ६३१ धावा करण्याची नोंद होती. त्याने २००६ मध्ये इंग्लंडविरूद्ध खेळताना ७ डावात ६३१ धावा केल्या होत्या. या यादीत राहुल द्रविड तिसऱ्या स्थानी आहे. २००२ मध्ये झालेल्या इंग्लंड दौऱ्यावर राहुल द्रविडने ६०२ धावा केल्या होत्या. तर विराट कोहलीने २०१८ मध्ये ५९३ धावा केल्या होत्या.

### इंग्लंडच्या फलंदाजांनी दमदार फलंदाजी

सुनील गावसकर यांनी १९७९ मध्ये ५४२ धावा केल्या होत्या.यासह शुबमन गिलच्या नावे आणखी एका मोठ्या विक्रमाची नोंद झाली आहे. त्याने इंग्लंडविरूद्ध फलंदाजी करताना एकाच डावात कर्णधार म्हणून सर्वाधिक धावा करण्याच्या बाबतीत विराट कोहलीला मागे सोडलं आहे. कर्णधार म्हणून शुबमन गिलने ६६८ धावांचा पल्ला गाठला आहे. याआधी हा विक्रम भारताचा माजी कर्णधार विराट कोहलीच्या नावावर होता. विराट कोहलीने २०१६-१७ कसोटी मालिकेत ६५५ धावा केल्या होत्या. इंग्लंडविरूद्ध सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम हा सुनील गावसकरांच्या नावावर आहे. लवकरच गिल हा विक्रम देखील मोडून काढू शकतो.भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये सुरू असलेल्या चौथ्या कसोटीत इंग्लंडच्या फलंदाजांनी दमदार फलंदाजी केली. भारतीय संघाने पहिल्या डावात फलंदाजी करताना ३५८ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना इंग्लंडच्या फलंदाजांनी दमदार फलंदाजी केली.

# न्यूझीलंडचा आफ्रिकेवर दमदार विजय

## 'कॅचेस वीन द मॅचेस', ब्रेसवेल अन् मिचेलचे भन्नाट झेल

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड आणि झिम्बाब्वे तिन्ही संघांने त्रिकोणीय मालिका पार पडली. या मालिकेतील अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिका आणि दक्षिण आफ्रिका हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना न्यूझीलंडने ५ गडी बाद १८० धावा केल्या होत्या.दक्षिण आफ्रिकेला हा सामना जिंकण्यासाठी १८१ धावा करायच्या होत्या.**




या धावांचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेला विजयासाठी शेवटच्या षटकात ७ धावा करायच्या होत्या.या सामन्यात धावांचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेला शेवटच्या षटकात विजयासाठी ७ धावांची गरज होती. त्यावेळी जॉर्ज लिंडे १० धावांवर तर डेवाल्ड ब्रेविस ३१ धावांवर नाबाद होता. न्यूझीलंडकडून शेवटचे षटक टाकण्यासाठी मॅट हेनरी गोलंदाजीला आला. सामना पूर्णपणे दक्षिण आफ्रिकेच्या हातात होता. पण षटकातील पहिलाच चेंडू निर्धाव राहिला. त्यानंतर दुसऱ्या चेंडूवर डेवाल्ड ब्रेविस झेलबाद होऊन माघारी परतला .

### न्यूझीलंडने केल्या 180 धावा

ब्रेविस बाद झाल्यानंतर कॉर्बिन बॉश फलंदाजीला आला. त्याने पुढील ३ चेंडूंवर २ धावा घेतल्या. शेवटच्या २ चेंडूंवर सामना जिंकण्यासाठी ४ धावा करायच्या होत्या. या षटकातील पाचव्या चेंडूवर लिंडे विकेट फेकून माघारी परतला. त्यामुळे शेवटच्या चेंडूवर दक्षिण आफ्रिकेला ४ धावांची गरज होती. या चेंडूवर हेनरीने एकही धाव खर्च केली नाही. शेवटच्या षटकात मायकल ब्रेसवेल आणि डॅरील मिचेलने सीमारेषेवर भन्नाट झेल घेतले. हे दोन्ही झेल न्यूझीलंडच्या विजयाचं कारण ठरले. यासह न्यूझीलंडने हा सामना ३ धावांनी जिंकून मालिकाही आपल्या नावावर केली.या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. न्यूझीलंडकडून पहिल्या डावात फलंदाजी करताना सलामीला आलेल्या टीम सिफर्टने २८ चेंडूंचा सामना करत ३० धावांची खेळी केली. तर डेवोन कॉनव्हेने ३१ चेंडूंचा सामना करत ४७ धावा केल्या. रचीन रविंद्रने २७ चेंडूत ४७ धावा केल्या.

DYP
Dr. D Y PATIL EDUCATIONAL COMPLEX, AKURDI, PUNE

D Y PATIL COLLEGE OF ENGINEERING AKURDI, PUNE
(An Autonomous Institute)

NBA NATIONAL BOARD of ACCREDITATION
Accredited by NBA

Accredited with 'A' Grade by NAAC

Institute Code -EN-6272

# ELIGIBILITY CRITERIA

## UNDERGRADUATE

### AFTER DIPLOMA

- Should have passed Diploma in Engineering and technology by obtaining at least 50% marks.

### AFTER HSC

- The aspirant should be an Indian National.
- Should Have passed HSC or its equivalent examination with Physics and Mathematics as compulsory subject along with one of the Chemistry or Biotechnology or Biology or Technical Vocational Subject.
- Should have obtained at least 50% marks should have appeared in all the subject in MHT CET 2024.

## POSTGRADUATE

- B.E./ B.Tech Degree in respective branch and Non Zero Score in GATE EXAM 2024



+91-20-27653054/58 info@dypcoeakurdi.ac.in dypcoeakurdi.ac.in @dypakurdipune



# तब्बल 1,722 विद्यार्थ्यांसाठी 1,593 नोकऱ्या

## शिक्षण विश्व: पीसीईटी सेंट्रल प्लेसमेंट सेलची उत्तम कामगिरी

। पिंपरी चिंचवड ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट व नूतन ग्रुपच्या पीसीसीओई, पीसीसीओईआर व नूतन अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या अंतिम वर्षातील १,७२२ विध्यार्थ्यांसाठी आतापर्यंत १,५९३ नोकऱ्या मिळाल्या आहेत. येत्या सहा महिन्यात बरेचसे नोकरी मेळावे होणार आहेत अशी माहिती पीसीईटी, नूतनच्या सेंट्रल प्लेसमेंट सेल चे अधिष्ठाता प्रा. डॉ. शितलकुमार रवंदळे यांनी दिली.**



विद्यार्थ्यांची निवड नामांकित अश्या आयटी कंपन्यात झाली आहे. काही कंपन्या व त्यांनी दिलेल्या नोकऱ्यांची संख्या पुढीलप्रमाणे : कॅपजेमिनी (३५६), ॲक्सेंचर (२४३), टेक महिंद्रा (१२८), एलटीआय माईंडट्री (७७), केपीआयटी (६५), कॉग्निझंट (५२) इत्यादी. रोजगाराच्या संधी दिलेल्या काही आयटी प्रॉडक्ट कंपन्या व त्यांनी दिलेले वार्षिक पगार पुढील प्रमाणे : लिंक्डइन (60 लाख), ॲमेझॉन (४७.८८ लाख), कॉमव्हॉल्ट सिस्टिम्स (३३ लाख), लेमा (30 लाख) इत्यादी. रोजगाराच्या संधी दिलेल्या काही कोअर मॅन्युफॅक्चरींग कंपन्या : फिलिप्स, महिंद्रा अँड महिंद्रा, डसॉल्ट सिस्टिम्स, टाटा टेक्नॉलॉजीज, ॲटलस कॉप्को, गोदरेज, मिंडा, अल्फा लावल इत्यादी. पीसीईटीचे सेंट्रल प्लेसमेंट सेल दर वर्षी विध्यार्थ्यांना सुमारे ३५० नामांकित कंपन्यांत नोकरीची संधी देते. पीसीईटीचे आतापर्यंतचे सर्वाधिक पॅकेज ६१ लाख (उबेर) आहे.

निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन पीसीईटीचे अध्यक्ष माजी आमदार श्री. ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा श्रीमती पद्माताई भोसले, सचिव श्री. विठ्ठल काळभोर, खजिनदार श्री. शांताराम गराडे, ट्रस्टी श्री. हर्षवर्धन पाटील, उद्योजक श्री. नरेंद्र लांडगे, उद्योजक श्री. अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, प्राचार्य डॉ. गोविंद कुलकर्णी, डॉ. हरीश तिवारी, डॉ. जहागीरदार, डॉ. सपली, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विध्यार्थ्यांनी केले आहे.

पीसीईटी, नूतनच्या सेंट्रल प्लेसमेंट सेल तर्फे डॉ. शितलकुमार रवंदळे, प्रा. संदीप पिल्लेवार, प्रा. दीपक पवार, प्रा. ऋषिकेश पांडे, प्रा. विजय टोपे, प्रा. हीना शर्मा प्रा. डेन्झेटा लोबो, श्री. मंगेश काळभोर सर्व विभागातील ट्रेनिंग प्लेसमेंट चे शिक्षक प्रतिनिधी व २०० हुन अधिक विध्यार्थी प्रतिनिधी यांनी योगदान दिले.

# संत साई शाळेच्या तीन विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

## शिक्षण विश्व: शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीमध्ये स्थान

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता पाचवी) शिष्यवृत्ती परीक्षा व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा (इयत्ता आठवी) अंतिम निकाल आणि शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे. शिष्यवृत्तीचा एकूण निकाल २२.०६ टक्के लागला आहे.**




इयत्ता पाचवीचा निकाल २३.०९ टक्के, तर इयत्ता आठवीचा निकाल १९.३० टक्के लागला आहे. एकूण निकालामधील ३१ हजार ७८६ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले असून, त्यात इयत्ता पाचवीमधील १६ हजार ६९३ विद्यार्थ्यांचा, तर आठवीतील १५ हजार ९३ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने इयत्ता पाचवी आणि इयत्ता आठवीसाठी ९ फेब्रुवारी २०२५ रोजी शिष्यवृत्ती परीक्षा घेतली होती. या परीक्षेसाठी राज्यभरातून ९ लाख ४४ हजार ४६३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती.

संत साई इंग्लिश मीडियम हायस्कूल, भोसरी, पुणे येथील तीन विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झालेली आहेत. इयत्ता पाचवीच्या कुमारी आर्या परशुराम गुरव हिने 228 गुण घेऊन जिल्ह्यात 347 वा नंबर मिळवला आहे.

तसेच विद्यालयातील इयत्ता आठवीच्या कुमारी संस्कृती ज्योतिबा लांडगे हिने 218 गुण घेऊन जिल्हास्तरीय यादीत 259 वा नंबर मिळवला आहे. त्याबरोबर इयत्ता आठवी मधीलच कुमार विनायक नवनाथ कारंडे याने सुद्धा 218 गुण घेऊन जिल्हास्तरीय यादीत 261 व नंबर मिळवला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेत अभिमानाचे व आनंदाचे वातावरण आहे.

संस्थेचे संचालक तथा मुख्याध्यापक शिवलिंग ढवळेश्वर सर , मुख्याध्यापिका सुनीता ढवळेश्वर , डायरेक्टर पायल ढवळेश्वर, उपमुख्याध्यापक रुपाली खोल्लम तसेच मार्गदर्शक संजना सिंघ व विठ्ठल पुंडे या सर्वांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले.

# अनुशासन विद्यार्थ्यांना शिखरापर्यंत पोहचवते- कडू पाटील

## शिक्षण विश्व: गायत्री इंग्लिश मिडीयम स्कूलचा पदग्रहण समारंभ संपन्न

। पिंपरी चिंचवड ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विद्यार्थी जीवनात शिस्तप्रिय असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अनुशासन प्रियता विद्यार्थ्यांना यशाच्या शिखरापर्यंत नेऊन पोचवते असे मत गायत्री इंग्लिश मीडियम स्कूलच्या व्यवस्थापकीय संचालिका कविताताई कडू पाटील म्हणाल्या.**



गायत्री इंग्लिश मिडीयम स्कूलचा पदग्रहण समारंभ शनिवारी (दि. 26) साजरा करण्यात आला. शालेय निवडणुकीमध्ये निवडून आलेल्या प्रमुख विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी कारगिल विजय दिवस निवडण्यात आला. यातून मुलांना नेतृत्वगुण समजावून सांगण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून तोमिओ इसोगाई, संस्था अध्यक्ष विनायक भोंगाळे , संस्था सचिव संजय भोंगाळे, व्यवस्थापकीय संचालिका कविता कडू पाटील, विश्वस्त सरिता विखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली भागवत, विपणन प्रमुख शैलेंद्र सिंग, सर्व मुख्याध्यापक-उपमुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या तोमिओ इसोगाई यांनी मुलांना करिअर संधी, शिक्षणाचे विविध विभाग, भारत आणि जपान या दोन राष्ट्रांमधील शैक्षणिक फरक, रोजगाराच्या संधी, आणि दोन्ही देशांच्या संस्कृती विषयी माहिती दिली. भारतातील हुशार तरुणांची जपानला गरज आहे. भारत आणि जपान मधील संस्कृती थोडीफार मिळतीजुळती आहे. येथील बऱ्याच देवांची पूजा जपानमध्येही केली जाते. पुढील महिन्यात येणारा गणेशोत्सव जपानमध्येही आम्ही साजरा करतो.

व्यवस्थापकीय संचालिका कविता कडू पाटील म्हणाल्या की, संस्था अध्यक्ष विनायक भोंगाळे यांचे स्वप्न आहे की, मुलांना अभ्यासासोबत एक चांगला उद्योजक करायचे आहे. आज कारगिल विजय दिनानिमित्त आपण हा कार्यक्रम साजरा करतोय, जेणेकरून तुम्हा मुलांमध्ये नेतृत्वगुण विकसित व्हावा. निवडून आलेल्या सर्व विद्यार्थ्यांची काय जबाबदारी आहे, ती त्यांनी मुलांना समजावून सांगितली. त्या म्हणाल्या, तुम्ही शिस्त अंगिकारली पाहिजे, प्रत्येक नियमांचे पालन तुम्ही आधी केले पाहिजे व बाकी विद्यार्थ्यांनाही ते शिकविले पाहिजे. आपण शिस्तप्रिय असणे किती महत्वाचे आहे हे त्यांनी त्यांच्या भाषणातून सांगितले.




Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046